# काळा दिवस

९ ऑगस्ट १९७७! जमनासाठी एक 'काळा दिवस'! ह्याच दिवशी तिच्यावर आक्रमण झाले. ती एका कामलोलूप जमिनदाराची शिकार बनली.

१७ वर्षांची ही तरुणी नुकतीच 'डहाणू' येथील चिक्कूच्या बागांवर कामाला लागली होती. तिचा नवराही शेठकडे कामाला होता. काही दिवसांपूर्वीच शेटजीकडून ४०० रुपये उसने घेतले. ते रोजगारातूनच कापण्याचे ठरले होते. पण आधीच तुटपुंजा पगार आणि मग त्यात कपात ! त्यानी काही भागेना म्हणून स्वतः दुसरीकडे नोकरी धरून बायकोला शेठजीकडे कामाला लावले. व अशा रितीनें कर्ज फेडण्याचा मार्ग शोधला. पण त्याला काय ठाऊक होते तो की आपल्याच पायावर कुऱ्हाड मारत होता.

नेहमी प्रमाणे मंगली, जमना, रुकमी कामाला गेल्या. त्या झाडावरून चिक्कू तोडत होत्या, तेवढ्यातच शेठजी तिथे येऊन पोहोचले. मंगली व रुकमीला तोडलेले चिक्कू घेऊन जाण्यास त्यांनी आज्ञा दिली व जमनाला तिथेच थांबवून घेतले. जमनाला काहीच उमजले नाही. शेठजीने तिला धरले व तिच्यावर बलत्कार केला. जमनाच्या हाका कोणालाच ऐकू गेल्या नाहीत. कोणीच तिच्या मदतीला आले नाही. शेटजी विरूद्ध येणार तरी कोण ? ही गोष्ट फक्त जमनाची नाही. अशा कितीएक जमना असतात ज्या शेटजी, जमिनदार यांच्या शिकार बनतात. पण असे घडते तरी कसे ? ह्याला कोण जबाबदार ? असे का घडते ?

ह्या प्रश्नाचे उत्तर समजण्यासाठी आपल्याला तिथली एकूण सामाजिक परिस्थिती बघायला पाहिजे. डहाणू हे ठाणे जिल्ह्यातील एक मुख्य गाव आहे. ह्या जिल्ह्यात मोठमोठ्या फळबागा व भाताची शेती आहे. ह्यांची मालकी मोठ्या गजराथी, इराणी, मारवाडी व महाराष्ट्रीय जमिनदारांकडे आहे. ह्या सावकार लोकांनी आदिवासीच्याच जमिनी हळूहळू लुबाडून आपल्या मालकीच्या करवून घेतल्या. त्यांना राबवून चैन करतात मात्र हे जमिनदार सावकार ! अत्यंत कमी मजूरीत आदिवासींना राबवून घेतले जाते. त्यांना उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. स्वतःची श्रमशक्ती विकणे हेच त्यांचे भांडवल. काम असते तेही वर्षांतून जेमतेम ६।७ महिने. बाकी दिवस ते कसे गुजराण करतात त्यांनाच ठाऊक ! पैसे सदाच अपुरे पडतात म्हणून कर्ज घ्यावे लागते. बँका काही खावटीसाठी कर्ज देत नाहीत. मग निरूपाय म्हणून शेवटी शेटजीचेच पाय धरावे लागतात. व श्रीमंत जमीन-मालक ह्याचा पुरेपुर फायदा घेऊन लहानसहान रकमेपोटी त्यांना बांधून ठेवतात. नुसते व्याजसुद्धा परत फेडणे कठीण तर मुदलाची गोष्ट दूरच. अशा रीतीने हे आदिवासी त्यांच्या जाळ्यात अडकून राहिलेले दिसतात व मुलामाणसासकट त्यांचे गुलाम बनतात.

अशा गुलामगिरीत जगणारे आदिवासी करणार तरी काय ? न्याय मिळवण्यासाठी पोलिसांकडे तक्रार नोंदवायची तर ते निरर्थकच. पोलिस तरी ह्या मालकवर्गाविरूद्ध जाण्यास कोठून धजावणार ? कोर्टात जाऊन वकील लावणेही पैशाच्या दृष्टीने अशक्य ! मग न्याय तरी कोठून मिळणार ? आर्थिक दौर्बल्य--हाच

त्यांचा दोष ! पण त्याला जबाबदार कोण ? ते स्वतः की शोषणारे जमीनदार ?

स्वातंत्र्य मिळून आज ३० वर्षं झाली. कित्येक कायदे केले गेले. गुलामगिरीविरुद्ध—सावकारीविरुद्ध ! पण ह्या आदिवासींना त्याचा काय उपयोग ? कायद्याची अंमलबजावणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कायदे करून त्याचा काय फायदा ?

शिवाय आपल्या समाजात अजून 'स्त्री' ही भोग्य-वस्तू म्हणून बघण्याचा दृष्टिकोन आहे. तिलाही म आहे. स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे मानायलाच अजून समाज तयार नाही. म्हणूनच जम व तिच्यासारख्या अनेक दुर्दैवी अबलांचे कायमचे नुक सान होते. पण ही परिस्थिती कोण बदलणार जोपर्यंत ज्यांच्यावर अन्याय होतो तेच एकजुटीने झग डत नाहीत, अन्याय चव्हाट्यावर आणीत नाहीत तोपर्यंत त्यांची दुःखे कोण निवारणार ? त्यांचे अश्र कोण पुसणार ?

—श्यामला वाघ

---

## जातीयतेची कीड

इतर अनेक ध्येयांबरोबर मनुस्मृतीचा कलंक धुवून काढण्यासाठी भारताने १९५० साली नवीन राज्यघटनेला मंजुरी दिली. ही राज्यघटना परिश्रमपूर्वक तयार करण्याची प्रमुख जबाबदारी स्वीकारणाऱ्या डॉ. आंबेडकरांचा सर्वत्र गौरव झाला. परंतु नागपूरपासून ६० मैल अंतरावर असणाऱ्या नवेगाव पांडव येथील काही जणांना मात्र डॉ. आंबेडकरांचे मोठेपण अद्याप सहन होत नाही.

तेथील ग्रामपंचायतीने म. गांधी व डॉ. आंबेडकर या दोनही थोर नेत्यांचे पुतळे उभारावयाचे ठरविले. म. गांधींच्या पुतळ्याचे उद्‌घाटन करण्याकरिता संपर्क मंत्री बोलवावयाचे आणि डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याच्या उद्‌घाटनासाठी बौद्ध लोकांना पसंत पडतील असे दुसरे कोणी प्रतिष्ठित पाहुणे बोलवावयाचे असे ठरले.

परंतु हे ठरले असूनही, काही जात्यंध लोकांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याच्या हाताची करंगळी जाऊन तोडली आणि चेहरा विद्रूप केला. याची प्रतिक्रिया लगेच उमटली आणि म. गांधींच्या पुतळ्याला चपलाहार घालण्यात आला. याचा 'सूड' म्हणून डॉ. आंबेडकरांचा ग्रंथधारी हात तोडण्यात आला आणि चेहऱ्याला डांबर फासण्यांत आले. शासन आणि समाज मात्र या सर्व दुःखद घटना तटस्थपणे पहात बसले होते.

व्यक्ती कितीही थोर असली, तरी तिच्या कर्तबगारीचे चिकित्सक दृष्टीने मूल्यमापन करणे आवश्यक असते. तसे न केल्यास, इतिहासाच्या घडणीतील समाजाचे स्थान दिसेनासे होते, आणि इसिहास-मीमांसा अशास्त्रीय बनते. परंतु या वैचारिक प्रवृत्तीची जोपासना होण्याकरिता समाजातील साऱ्या मान्यवर नेत्यांचा पुरेसा मान समाजाने राखला पाहिजे. द्वेषमूलक पक्षपात झाला, तर समाजातील काही घटकांमध्ये व्यक्ती-पूजेची भावना बलवत्तर होत जाते. एखाद्या प्रतिष्ठित संस्थेला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याचे बाबतीत खळखळ होऊ लागली, त्यांच्या ग्रंथप्रकाशनाला जलद गतीने चालना मिळाली नाही, त्यांचे पुतळे उध्वस्त होऊ लागले तर दलितांच्यात व्यक्ती-पूजेची भावना अपरिहार्यपणे बळावत जाईल. दुष्कृत्ये करण्याबाबत दलितेतर समाजाने आणि शासनाने जर औदासीन्य दाखविले तर सामाजिक भेदभाव वाढत जातील आणि याचा दोष दलितांना देता येणार नाही. ★